Please consider the environment before printing...

दिनांक:- 26 / 02 / 2024

# Death Anniversary of Anandibai Joshi Death
# आनंदीबाई जोशी पुण्यतिथी

Jagdamba Education Society's



## प्रस्तावना:

वयाच्या केवळ अठराव्या वर्षी बोटीने परदेशी जाणारी पहिली भारतीय स्त्री, फक्त भारतातच नव्हे तर, परदेशातही कुचेष्ठा, अपमान सहन करीत, एकोणिसाव्या शतकात भारतात स्त्रियांचे प्राथमिक शिक्षण ही खडतर असतानाही हाती घेतलेले जीवित कार्य जिद्दीने पूर्ण करणारी स्त्री म्हणजे आनंदीबाई जोशी. अशा काळातही २००० मैलावर जाऊन डॉक्टर झालेली पहिली भारतीय स्त्री, जिच्या सन्मानार्थ शुक्रावरील विवराला तिचे नाव देण्यात आले आहे, ती भारतीय स्त्री, डॉक्टर आनंदीबाई जोशी. धैर्य, दृढ निश्चय, बुद्धिमत्ता व अभ्यासूवृत्ती या गुणांच्या आधारे अमेरिकेत जाऊन, भारतातल्या पहिल्या महिला डॉक्टर होण्याचा बहुमान मिळविणाऱ्या, डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी.

- पूर्ण नाव : आनंदीबाई गोपाळराव जोशी
- आधीचे नाव : यमुना
- जन्म तारीख : दि. ३१ मार्च १८६५ रोजी
- जन्म स्थळ : पुणे
- ओळख : भारतातील पहिली महिला डॉक्टर

- शिक्षण : एम. डी
- व्यवसाय : डॉक्टर
- पतीचे नाव : गोपाळराव जोशी
- मृत्यू : दि. २६ फेब्रुवरी १८८७
- मृत्यूचे कारण : क्षयरोग

## कोण होत्या आनंदीबाई गोपाळ जोशी ?

आपल्या भारत देशातली पहिली महिला डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी. ऐकून थोडा आश्चर्य वाटले असेल, पण हा मान एका मराठमोळ्या स्त्रीला मिळाला, जी की आपल्या सगळ्यांसाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे.आज सुद्धा गावामध्ये एका मुलीला दुसऱ्या गावात एकटीला पाठवत नाही, पण त्या काळात म्हणजे अंदाजे १५० वर्षांपूर्वी या स्त्रीने चक्क अमेरिकेत सात समुद्राच्या पार जाऊन, डॉक्टरची पदवी मिळवली आणि ती सुद्धा फक्त वयाच्या २१ व्या वर्षी.त्या काळात सावित्रीबाईंनी जरी स्त्री शिक्षणाची मुहूर्त मेढ रोवली तरी सुद्धा पुरुष प्रधान संस्कृती असल्यामुळे, स्त्रीला दुय्यम स्थान दिले जात होते. फक्त चूल आणि मूल एवढेच त्यांचे काम अशी समजूत असताना, डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी यांनी अमेरिकेत जाऊन डॉक्टर झाल्या.

## वयाच्या १९ व्या वर्षी आनंदीबाई यांनी मिळवली डॉक्टरेट पदवी:

१९ व्या वर्षाच्या आनंदीबाईंनी पेनसिल्व्हेनियातील महिला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. शिक्षण घेताना, आनंदीबाईंचे आरोग्य नेहमी बिघडायचे, पण त्यावर मात करत १८८६ मध्ये त्यांनी एम.डीची पदवी मिळवली. प्राचीन हिंदू स्त्रियांच्या प्रस्तुती करणावर अभ्यास करून, आनंदीबाईंनी आपला प्रबंध पूर्ण केला. पदवी मिळवल्यानंतर खुद्द राणी विक्टोरिया हिने अभिनंदनचा संदेश आनंदीबाईंना पाठवला होता. अमेरिकेतील समाज ही आनंदीबाईंशी दुष्टपणे वागत होता. परंतु त्यांच्या कार्पेटरेटर बाई आणि विद्यापीठाच्या अधिष्ठा श्रीमती रेचल बॉडले यांसारख्या यांसारख्या मदत करणाऱ्या स्त्रियांमुळे, त्यांना हा कालावधी थोडा सुसह्य झाला. अमेरिकेच्या त्यांच्या मेडिकल कॉलेजने दि. ११ मार्च १९८६ रोजी फिलाडेल्फियाला डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी यांना वैद्यकीय विद्या पारंगत हा किताब दिला. त्यांच्या पदवीदान समारंभाला गोपाळराव स्वतः उपस्थित राहिले.

## आनंदीबाई जोशी यांचा वारसा:

1. १८८८ मध्ये अमेरिकन स्त्रीवादी लेखिका कॅरोलीन वेल्स हीली यांनी आनंदबाईंचे चरित्र लिहिले.
2. आनंदी गोपाळ या नावाची हिंदी मालिका दूरदर्शनवर प्रसारित करण्यात आली. या मालिकेचे दिग्दर्शन कमलाकर सारंग यांनी केले.
3. तसेच श्रीकृष्ण जनार्दन जोशी यांच्या आनंदी गोपाळ या मराठी कादंबरीमध्ये, आनंदीबाई जोशींची व गोपाळराव जोशी यांची जीवनकथा काल्पनिक रित्या रचली आहे. रामजी जोगळेकर यांनी त्यांच्या नाटकात आनंदी गोपाळ कादंबरीचे रूपांतर केले आहे.

4. डॉक्टर अंजली किर्तन यांनी डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी यांच्या जीवनावर आधारित, सखोल संशोधन केले व त्याचवेळी त्यांनी आनंदीबाईंच्या कर्तुत्वा विषयी डॉक्टर आनंदी जोशी काळ आणि कर्तृत्व हे मराठी पुस्तक प्रकाशित केले. त्या पुस्तकांमध्ये डॉक्टर आनंदीबाई जोशी यांची दुर्मिळ छायाचित्रे आहेत.
5. लखनऊ मधील एका स्वयंसेवी संस्था रिसर्च अँड डॉक्युमेंटेशन इन सोशल सायन्सेस, भारतातील वैद्यकीय विज्ञानाच्या प्रगतीसाठी, तिच्या सुरुवातीच्या योगदानाची दखल घेऊन, आनंदीबाई जोशी यांच्या नावाने आनंदीबाई जोशी पुरस्कार देऊन गौरवित करण्यात आले होते.
6. याव्यतिरिक्त महाराष्ट्र सरकारने महिलांच्या आरोग्यावर काम करणाऱ्या तरुणींसाठी, डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी यांच्या नावाने फेलोशिप स्थापन केली आहे.
7. शुक्रावरील एका विवराला आनंदीबाई जोशी यांच्या नावाने जोशी असे नाव देण्यात आले आहे.
8. २०१९ मध्ये आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावर आधारित आनंदी गोपाळ नावाचा मराठी चित्रपट प्रकाशित करण्यात आला आहे.

## डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी यांच्याबद्दलची पुस्तके:

1. आनंदी गोपाळ : श्री.ज. जोशी यांनी लिहिलेली कादंबरी
2. डॉ. आनंदीबाई जोशी : काळ आणि कर्तृत्व (अंजली कीर्तने)
3. आनंदी गोपाळ : (मराठी नाटक, लेखक – राम जोगळेकर)
4. कै.सौ. डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र : काशीबाई कानिटकर

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
LIBRARIAN
YEOLA DIST. NASHIK

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401